महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट/203/पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड /2025 / दिनांक : 20/05/2025

---

# 1)खुनाचा प्रयत्न :–

**अर्धापुर :–** दिनांक 17.05.2025 रोजी 22.30 वा. चे सुमारास **मौ. येळेगाव महालक्ष्मी किराणा दुकानासमोर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.गणेश कपाटे व इतर सात आरोपीतांनी संगणमत करून गैरकायदयाची मंडळी जमवून हातात लोखंडी रॉड व लाकुड घेवुन फिर्यादीचे दुकानासमोर आले असता फिर्यादीने यातील आरोपीस तु मला दुपारपासून फोन करून शिवीगाळ करून धमकी का देत आहेस व मावस बहीणीस त्रास का देत आहेस असे विचारले असता आरोपीने हातातील लोखंडी रॉडने डोक्यात मारून गंभीर दुखापत करून फिर्यादीचे गळयातील सोन्याची चैन व खिशातील नगदी 25,000/–रूपये काढून नेले. तसेच फिर्यादीचे मामाच्या मुलास लोखंडी रॉडने हातावर मारहाण करून फ्रॅक्चर केले व यातील साक्षीदार हे भांडण सोडविण्यासाठी आले असता त्यांना शिवीगाळ करून लाथाबुक्यानी मारहाण केली. फिर्यादीचे डोक्यात मारून गंभीर जखमी करून खुन करण्याचा प्रयत्न केला. व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी उमेश बाबाराव कपाटे, वय 25 वर्षे, व्यवसाय शेती रा. येळेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 301/2025 कलम 109, 118(2),119,189(2),191(2),191(3),115(2),352,351(2),(3)बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/कऱ्हाळे, मो. नं. 7057898486** हे करीत आहेत.

**2)देगलुर :–** दिनांक 18.05.2025 रोजी 10.00 वा. चे सुमारास **मौ. चैनपूर ता. देगलुर जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.अशोक गोविंद वाघमारे, 2.कबीरदास अशोक वाघमारे, 3.सत्यजीत अशोक वाघमारे, 4.पंचशिला अशोक वाघमारे, सर्व रा. चैनपुर ता. देगलुर यांनी संगनमत करून फिर्यादी हे त्यांचे प्लॉटवर दगडाची पैळ रचवित असताना पैळ का रचवित आहेस असे म्हणुन शिवीगाळ करून फिर्यादीचा मुलगा यास काठीने डोक्यात मारहाण करून गंभीर जखमी केले. व फिर्यादीचा भाचा भांडण सोडविण्यासाठी आला असता त्यांचे डाव्या हातास मारहाण करून गंभीर दुखापत करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी विजयलक्ष्मी संजय वाघमारे, वय 42 वर्षे व्यवसाय मजुरी रा. चैनपुर ता. देगलुर जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 259/2025 कलम 109,118(1),115(2),352,3,(5) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/फड मो. नं. 9130087444** हे करीत आहेत.

**3)किनवट :–** दिनांक 18.05.2025 रोजी 21.30 वा. चे सुमारास **गुरूदेव कटिंग दुकान किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील आरोपी नामे संदीप जाधव रा. गंगानगर ता. किनवट हा यातील फिर्यादीचे दुकानात दाढी करण्यासाठी म्हणुन बसला असता काही वेळाने अचानक उठून माझा नंबर लवकर लावता का नाही असे म्हणुन शिवीगाळ करून दुकानातील वस्तरा हातात घेवून फिर्यादीचे गळयावर मारण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादीने तो चुकविल्याने डाव्या गालावर गंभीर दुखापत झाली. तेव्हा भांडण सोडवित असताना यातील साक्षीदार राजेश भास्कर सुरजवाड, यांना शिवीगाळ करून डाव्या हातास दुखापत करून जिवे मारण्याची धमकी दिली व खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी हानमनलु दिगांभर खासे, वय 35 वर्षे व्यवसाय कटिंग काम रा. धोबीगल्ली किनवट ता.किनवट जि. नांदेड** यांचे फिर्यादीवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 152/2025 कलम 109,118(1),352(2),351(3) बीएनएस–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/झाडे मो. नं. 8668842897** हे करीत आहेत.

# 2)जनावर चोरी :–

**सोनखेड :–** दिनांक 18.05.2025 रोजी 12.00 वा.ते दिनांक 19.05.2025 रोजी 05.30 वा.चे दरम्यान **मौ.सोनखेड ता. लोहा जि.नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे घराजवळ बांधलेले एक गाय व एक वासरू एकुण किंमत 50,000/–रूपयाचे गोवंश जातीचे जनावरे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी मारोती भगवानराव मोरे, वय 39 वर्षे, व्यवसाय शेती रा. सोनखेड ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे सोनखेड** गुरनं 120/2025 कलम 303(2) भारतीय न्याय संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2342 हंबर्डे, मो. नं. 9284422052** हे करीत आहेत.

## 3)जुगार :—

**1)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 19.05.2025 रोजी 16.00 वा. चे सुमारास **खुदबेगनर चौरस्ता पत्राचे शेडमध्ये नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.श्याम रामराव गरूडकर, व इतर चार हे विना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे मटका नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 2610/—रू व तीन मोबाईल फोन असा एकुण किंमती 23,620/—रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/221 माधव गणपतराव माने, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण गुरनं 480/2025 कलम** 12(अ) म जु का प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/कदम मो. नं. 9284351496** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :—** दिनांक 19.05.2025 रोजी 17.00 वा. चे सुमारास **खुदबेगनर चौरस्ता फंक्शन हॉलकडे जाणारे रोडवर नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.अहेमद मेहराज अहेमद मुख्तार, व इतर दोन हे विना परवाना बेकायदेशिररित्या नागपूर ओपन मटका नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 1860/—रू व दोन मोबाईल फोन असा एकुण किंमती 21,860/—रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/599 मारोती शंकरराव पंचलिंग, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण गुरनं 481/2025 कलम** 12(अ) म जु का प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/811 यालावार मो. नं. 7262845922** हे करीत आहेत.

**3)भाग्यनगर :—** दिनांक 19.05.2025 रोजी 15.35 वा. चे सुमारास **राज कॉर्नर ते कल्याण नगर जाणारे रोडवर नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1. नितुल विनोद चव्हान, वय 39 वर्षे, व्यवसाय मजुरी रा.निळारोड श्यामनगर नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या टाईम बाजार मटका नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 3300/— रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/614 अनिल नागनाथराव सातारे, ने. पोस्टे भाग्यनगर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे भाग्यनगर गुरनं 287/2025 कलम** 12(अ) म जु का प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2940 मोरतोडे, मो. नं. 9960317910** हे करीत आहेत.

**4)शिवाजीनगर :—** दिनांक 19.05.2025 रोजी 15.30 वा. चे सुमारास **फुले मार्केट ते वाय पॉईट जाणारे रोडवर पत्राचे शेडमध्ये नांदेड येथे,** यातील आरोपी नामे 1.संदिप संजय पोहरे, वय 27 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. आंबेडकर नगर नांदेड हा विना परवाना बेकायदेशिररित्या कल्यान मटका नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना जुगाराचे साहित्य व नगदी 1950/— रूपयाचे मुद्देमालासह मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/3045 विजय मारोती जाधव, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे शिवाजीनगर गुरनं 202/2025 कलम** 12(अ) म जु का प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोहेकॉ/2753 लियाकत, मो. नं. 8806863445** हे करीत आहेत.

## 4)प्रोव्हिबिशन :—

**माळाकोळी :—** दिनांक 19.05.2025 रोजी 18.45 वा. चे सुमारास **मौ. माळाकोळी जगदंब हॉटेल ता. लोहा जि.नांदेड येथे** यातील आरोपी नामे नितीश शिरीष राठोड, वय 24 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. अष्टूर ता.लोहा हा विना परवाना बेकायदेशिररित्या देशी व विदेशी दारू किंमत 2260/—रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने आपले ताब्यात बाळगलेला मिळून आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/प्रभाकर अंबाराव क्षीरसागर ने. पोस्टे माळाकोळी** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 90/2025 कलम 65(ई), म. प्रो. का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/954 कल्लेवर, मो.नं. 9823842188** हे करीत आहेत.

## 5)गळफास घेवून शेतकरी आत्महत्या :—

**उस्माननगर :—**दिनांक 19.05.2025 रोजी 08.25 वा.चे सुमारास **मौ. हाळदा ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे बालाजी गोविंद कोंडेवाड, वय 45 वर्षे, व्यवसाय शेती रा. हाळदा ता. कंधार जि. नांदेड**, यांनी सततचे नापिकीला कंटाळुन शेतातील लिंबाचे झाडास गळफास घेवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार शंकर गोविंद कोंडेवाड, वय 47 वर्षे, रा. हाळदा ता. कंधार जि. नांदेड**, यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे उस्माननगर** आ. मृ. 23/2025 कलम 194 भारतीय न्याय संहीता—2023 प्रमाणे दाखल असुन **तपास पोहेकॉ/2232 पवार, मो.नं. 7776088897** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी,
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड